# माती परीक्षणासाठी नमुना

परीक्षणाच्या माध्यमातून जमिनीचे भौतिक व रासायनिक गुणधर्म समजून घेतल्यानंतर त्यानुसार आवश्यधक असणाऱ्या सेंद्रिय खते, जैविक खते आणि रासायनिक खतांचा पुरवठा एकात्मिक पद्धतीने जमिनीस केल्यास जमिनीचे आरोग्य टिकविण्या बरोबर पिकाचे अपेक्षित उत्पादन मिळू शकते.

**नमुना घेण्याची पद्धत :**

१) मातीचा नमुना घेण्यासाठी वापरण्यात येणारी अवजारे उदा.: फावडे, कुदळ, घमेले, खुरपी इत्यादी स्वच्छ असावीत.

२) मातीचा नमुना पिके काढल्यानंतर परंतु नांगरणीपूर्वी घ्यावा.

३) पिकास रासायनिक खते दिले असल्यास तीन महिन्यांच्या आत संबंधित जमिनीतून माती नमुना घेऊ नये.

४) निरनिराळ्या प्रकारच्या जमिनीचे किंवा शेतातील मातीचे नमुने एकत्र मिसळू नयेत.

५) माती नमुना गोळा करताना किंवा प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवताना रासायनिक खतांच्या रिकाम्या पिशव्यांचा वापर करू नये.

६) शेता मधील खते साठविण्याची जागा, कचरा टाकण्याची जागा, जनावरे बसण्याची जागा, झाडाखालील जागा, विहिरी जवळ, पाण्याचे पाट व शेताचे बांध इत्यादी जागां मधून किंवा जवळून मातीचे नमुने घेऊ नयेत.

**असा घ्या मातीचा नमुना :**

१) नमुना काढण्यासाठी शेतात गेल्यानंतर प्रथम शेतीची पाहणी करावी व जमिनीच्या प्रकारानुसार शेताचे विभाग पाडावेत. हे विभाग पाडताना जमिनीची रंग, खोली, पोत, उंच-सखलपणा, पाणथळ किंवा टोपण जागा इ., बाबींचा विचार करावा. अशा प्रकारे विभागातून एक स्वतंत्र प्रातिनिधिक नमुना घ्यावा.

२) एका हेक्टरमधून १५ ते २० ठिकाणची माती घ्यावी, मातीचा नमुना घेण्यासाठी प्रत्येक विभागात नागमोडी रेषा काढून प्रत्येक वळणावर खड्डा घ्यावा. निवडलेल्या प्रत्येक ठिकाणाच्या जागेवरील काडी कचरा, दगड इत्यादी बाजूला करावेत. प्रत्येक ठिकाणी इंग्रजी (व्ही) आकाराची हंगामी पिकासाठी २५ सें.मी., तर फळपिकासाठी ६० सें.मी. खोलीचा खड्डा घेऊन त्यातील माती बाहेर काढून खड्डा मोकळा करावा.

३) खड्ड्याच्या सर्व बाजूने सारख्या जाडीची माती वरपासून खालपर्यंत तासून, ती स्वच्छ घमेल्यात गोळा करून गोणपाटावर ठेवावी.

४) अशा तऱ्हेने प्रत्येक खुणेजवळ खड्डे घेऊन एका शेतातून गोळा केलेली माती चांगली एकत्र मिसळावी, तिचे सारखे चार भाग करावेत. समोरासमोरचे दोन भाग वगळून उरलेले दोन भाग पुन्हा एकत्र मिसळून, त्याचे चार भाग करावेत आणि पुन्हा समोरासमोरचे दोन भाग वगळावेत.

५) अशा तऱ्हेने शेवटी दोन ओंजळी किंवा अर्धा किलो ग्रॅम माती शिल्लक उरे पर्यंत असे करावे. मातीच्या नमुन्यासोबत शेतकऱ्याचे नाव, गाव, जिल्हा, सर्व्हे नंबर / गट नंबर व पुढील हंगामात घ्यावयाचे पीक याबाबत सविस्तर माहिती लिहून माती परीक्षण प्रयोगशाळेत पाठवावी.

# पाण्याची प्रत तपासणी

सिंचनासाठी वापरण्यात येणाऱ्या अयोग्य आणि समस्यायुक्त पाण्याचा पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम होतो. यासाठी पाण्याचे परीक्षण करून योग्यते नुसार पाण्याचा सिंचनासाठी वापर करावा. पुढील गोष्टी लक्षात घेऊन सिंचनाच्या पाण्याची तपासणी करावी. पाणी चवीस खारवट किंवा मचूळ वाटत असल्यास, पाण्याचा सिंचनासाठी वापर केलेल्या शेतातील जमिनीच्या पृष्ठभागावर क्षारांचा पांढराथर दिसून आल्यास, पीक उगवणीस अडथळा होताना दिसून आल्यास किंवा उगवलेल्या पिकांचे शेंडे करपताना दिसून आल्यास, जमीन चोपण चिबड होऊन पृष्ठभागावर पाणी थांबत असल्यास, जमिनीवर चालताना जमीन टणक झाल्याचे जाणवत असल्यास पाण्याचा नमुना परीक्षणासाठी द्यावा. निरनिराळ्या सिंचन साधनांमधून घेतलेला पाण्याचा नमुना प्रातिनिधिक असावयास पाहिजे. पाणी तपासणीच्या बाटलीवर शेतकऱ्याचे नाव व पत्ता, शेताचा भूमापन क्रमांक, नमुना घेतल्याची तारीख व थोडक्यात पाण्याबाबत शेतकऱ्याचे अनुभव लिहिलेले लेबल बाटलीला चिकटवून प्रयोगशाळेत पाठवावा. याबाबत अधिक माहिती पुढील क्रमांकावर संपर्क साधल्यास मिळू शकेल.

**पाण्याचा नमुना घेताना :**

विहिरीच्या पाण्याचा नमुना घेताना विहिरीतील पाणी प्रथम चांगले ढवळून घ्यावे. विहिरीवर पंप बसविलेला असेल तर तो साधारण १५ ते २० मिनिटे सुरू ठेवून पाणी जाऊ द्यावे. काचेची किंवा प्लॅस्टिकची बाटली स्वच्छ धुऊन घ्यावी आणि त्यामध्ये एक लिटर पाणी भरावे. कूपनलिकेमधील पाण्याचा नमुना सुद्धा अशाच प्रकारे घ्यावा. नदीमध्ये साठलेले पाणी किंवा तलावातील नमुना घेण्यासाठी लांब बांबूच्या टोकाला दोरीच्या साह्याने लहान बाटली बांधून पाणी ढवळून नमुना घ्यावा.

## द्राक्ष काडी/डोळ तपासणी

द्राक्षात फळ छाटणीच्या आधी काडीची परिपक्वता, काडीवरील डोळ्याची प्रत, कुज, मृत डोळ, डोळ्यातील घडाची प्रत (सशक्त अथवा कमकुवत) तपासणे, मेन केन व सबकेन यातील कुठल्या डोळ्यात सूक्ष्म द्राक्षघड निर्मिती झाली आहे याबाबत ची माहिती इ. गोष्टी आधुनिक मशिनच्या सहाय्याने प्रयोगशाळेत तपासून घेता येतात. यावरून छाटणीच्या आधी आपल्याला बागेची सविस्तर माहिती कळते व त्यानुसार आपल्याला महत्वपूर्ण निर्णय घेता येतात. याकरिता प्रत्येक प्लॉट मधून वेगवेगळ्या ठिकाणाहून कमी जास्त प्रतीच्या सर्वसमावेशक अशा दहा काड्या ओलांड्यापासून कात्रीने छाटून घ्याव्या. काड्या सरळ असव्यात. सबकेन वरील सुरवातीचे पाच डोळ ठेवून बाकी पुढची काडी छाटून टाकावी. एका झाडावरून एकाच काडी घ्यावी. काड्या बागेतून घेतल्यावर लवकरात लवकर (डोळ व काडी सुकन्याच्या आत) तपासणीसाठी प्रयोशाळेत पोहचेल असे पहावे. प्रत्येक काडीवर पेनने नंबर टाकावा. ह्या प्रातिनिधिक काड्यांच्या आधारे संपूर्ण बागेचा आपल्याला अंदाज करता आला पाहिजे.

## द्राक्ष पान देठ तपासणी

जुन्या बागांमध्ये झालेल्या सतत आणि जास्त पावसामुळे होणाऱ्या पाण्याच्या निचऱ्यासोबत बोदामधील मुळांच्या कक्षेमध्ये असलेल्या अन्नद्रव्यांचे वहन झाले. याला इंग्रजीमध्ये लिचिंग असे म्हटले जाते. संपूर्ण हंगामासाठी असलेल्या शिफारशीप्रमाणे किंवा आपल्या अनुभवानुसार बागेमध्ये अन्नद्रव्यांचा वापर केला असला, तरी तो त्याच हंगामामध्ये पूर्णपणे वापरला जाईल असे नाही, त्याला अनेक कारणे जबाबदार असतात. उदा. वेलीची मुळे किती सक्षम आहेत. बोदामध्ये पाणी किती उपलब्ध झाले, बागेतील तापमान किती आहे. अशा अनेक घटकांचा वापर अन्नद्रव्याच्या वापरावर परिणाम होत असतो. मात्र या वर्षीच्या अति पावसाच्या स्थितीमुळे अन्नद्रव्य मुळांच्या कक्षेबाहेर निघुन गेल्याचे दिसते. परिणामी अनेक बागांमध्ये द्राक्षवेलीवर अन्नद्रव्यांच्या कमतरता दिसून येत आहेत. त्यामध्ये वेलीची पाने पिवळी पडणे आणि पातळ होणे, पानांच्या शिरा हिरव्या राहून मध्यभाग पिवळा पडणे, पानांचा आकार कमी राहणे, शेंडा वाढ थांबणे इत्यादी समस्या दिसून येत आहेत. अशक्त असलेली वेल ही रोगास व किडीच्या प्रादुर्भावास लवकर बळी पडताना दिसत आहे.

**उपायोजना :**

* पानांमध्ये मुख्यतः मॅग्नेशियम, फेरस व झिंग यांची कमतरता दिसून येतात, ज्या बागेमध्ये फुलोरा अवस्था आहे, अशा बागेतील घडाच्या विरुद्ध पान काढून देठ गोळा करावेत. १ एकर क्षेत्रातून सुमारे १०० ते १२० डेट गोळा करून देठ परीक्षणासाठी पाठवावेत.
* ज्या बागा फुलोरा अवस्थेच्या पुढील अवस्थेमध्ये आहेत किंवा १० ते १५ दिवस होऊन गेले आहेत, अशा बागेमध्ये घडाच्या पुढील पान निवडावे, त्याची तपासणी करून घ्यावी. त्यामुळे बागेत नेमक्या कोणत्या अन्नद्रव्यांची कमतरता आहे हे स्पष्ट होईल.
* साधारण परिस्थितीमध्ये बागेत फेरस सल्फेट २.५ ते ३ ग्रॅम मॅग्नेशिअम सल्फेट ३ ते ३.५ ग्रॅम झिंक सल्फेट १ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे एक ते दोन फवारण्या महत्वाच्या असतील. ज्या बागेत पाने पिवळी दिसतात व शेंडा थांबला आहे, अशा बागेत नत्राची कमतरता असू शकते, अशा बागेमध्ये नत्राची पूर्तता जमिनीद्वारे करावी.



**वरील सर्व तपासण्या शास्त्रोक्त पध्दतीने करण्यासाठी तसेच खते व संजिवके यांचीही तपासणी करण्यासाठी आजच संपर्क साधा...**

EST : 1993

ALPHA®

Brand Name in Purity

# अल्फा कृषी लॅबरोटरी



मुख्य कार्यालय : 'आश्रय', दगुनाना मोरे नगर, तुळजाभवानी मंदिरा मागे, पिंपळगांव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक.

लॅब : गट नं. ४०४/२, शेड नं. डी-१, कानमंडाळे रोड, शिंदे, ता. चांदवड, जि. नाशिक.

फोन : ०२५५०-२५२४७३, ९४२२२ ५८१७३, ९५५२२ ४२१७६.